# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 10.04.2026** **वारः शुक्रवार**

1. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून कॉंग्रेसची माघार
2. बारामतीमध्ये 23; तर राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी सात उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात
3. विधिमंडळांमध्ये महिलांना आरक्षण देणं, ही काळाची गरज असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन आणि
4. 15 हजार 400 टन एलपीजी असलेलं भारताचं ग्रीन आशा जहाज जेएनपीए बंदरात दाखल

**बारामती निवडणूक**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून कॉंग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी काल आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याप्रती आदर दर्शवण्यासाठी कॉंग्रेसने आपला उमेदवार मागे घेतल्याचं कॉंग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी वार्ताहरांना सांगितलं. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत याबाबत अधिक माहिती दिली. भाजपाच्या विचारधारेला विरोध म्हणून, कॉंग्रेसनं बारामती मतदारंघात उमेदवार दिला होता, मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध नेत्यांनी कॉंग्रेसच्या नेत्यांशी संपर्क साधून निवडणूक बिनविरोध करण्याची विनंती केली, त्यामुळे सामंजस्य आणि संवादाची भूमिका घेत, पक्षानं उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचं सपकाळ यांनी सांगितलं.

दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी 53 पैकी 30 उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले; त्यामुळे आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह 23 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

**राहुरी-पोटनिवडणूक**

राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी सात उमेदवार रिंगणात आहेत. एकंदर 30 जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते, अर्ज मागे घेण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत 23 जणांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता, भाजपचे अक्षय शिवाजी कर्डिले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडी पक्षाचे संतोष चोळके, आणि चार अपक्ष उमेदवार यांच्यात लढत होणार आहे.
बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी 23 एप्रिल रोजी मतदान होणार असून 4 मे रोजी मतमोजणी होणार आहे.

**चांदिवली निवडणूक-छाननी**

2024 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत, चांदिवली विधानसभा मतदारसंघात झालेल्या निवडणुकीतील ईव्हीएमची तपासणी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार दिलीप लांडे यांनी, नसीम खान यांचा पराभव केला. या निर्णयाविरोधात, खान यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

**पुद्दूचेरी,आसाम,केरळमतदान**

पुद्दूचेरी, आसाम आणि केरळम विधानसभा निवडणुकांसाठी काल मतदान झालं. पुद्दूचेरीत सुमारे 90 टक्के, आसाममध्ये 85 टक्के आणि केरळमध्ये 78 टक्के मतदानाची नोंद झाली. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. तमिळनाडूमध्ये येत्या 23 एप्रिल रोजी एकाच टप्प्यात, तर पश्चिम बंगालमध्ये 23 आणि 29 एप्रिल अशा दोन टप्प्यात मतदान होणार आहे.

**पार्थ पवार-शपथ**

राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्थ पवार यांनी काल सदस्यत्वाची शपथ घेतली. उपराष्ट्रपती तसंच राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. संसद भवनातल्या अध्यक्षांच्या परिषद कक्षात पार्थ पवार यांचा शपथविधी झाला.

**मुख्यमंत्री-नवकार**

नवकार महामंत्रामध्ये विश्व कल्याणची शक्ती असून, या महामंत्राच्या जपाचा, विश्वशांतीसाठी निश्चितच सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन यांच्यावतीने विश्व नवकार महामंत्र दिवस कार्यक्रमाचं काल मुंबईत आयोजन करण्यात आलं होतं, त्याप्रसंगी ते बोलत होते. जैन समाज प्राणीसेवेचा विचार केवळ शब्दांमध्ये न ठेवता, तो प्रत्यक्षात आणला जातो, असे गौरवोद्गारही फडणवीस यांनी काढले. या कार्यक्रमाला जैन समाजातील आचार्य, मुनी, उपाध्याय, साध्वी आणि जैन समाज बांधव उपस्थित होते.

**गहिनीनाथ गड**

बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या 94व्या नारळी सप्ताहाचा समारोप काल मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे यांच्यासह अन्य मान्यवर आणि भाविक उपस्थित होते.

**पंतप्रधान-महिला आरक्षण**

भारतीय लोकशाहीला अधिक चैतन्यपूर्ण आणि सहभागात्मक बनवण्यासाठी, विधिमंडळांमध्ये महिलांना आरक्षण देणं, ही काळाची गरज आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. महिला आरक्षण विधेयक अधिक बळकट करण्यासाठी 16 ते 18 एप्रिल दरम्यान संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं आहे. या अनुषंगानं काल पंतप्रधानांनी समाज माध्यमांवर एक ध्वनि-चित्रफित प्रसारित केली. यामध्ये बोलताना पंतप्रधान म्हणाले.....

**हमने कुछ वर्ष पहले नारी शक्ति वंदन अधिनियम पारित किया था, और सभी राजनीतिक दलों ने सहमति से किया था। और सबकी इच्छा है कि 2029 में जब लोकसभा के चुनाव होंगे तब हमारे देश के नारी शक्ति को जनप्रतिनिधियों के रूप में लोकसभा में विधानसभाओं में 33 प्रतिशत स्थान मिलना ही चाहिए।**

**ग्रीन आशा**

एल पी जी वाहून नेणारं, भारताचं 'ग्रीन आशा' नावाचं जहाज, होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून काल मुंबई जवळील जवाहरलाल नेहरू बंदरात दाखल झालं. या जहाजात 15 हजार 400 टन एल पी जी साठा आहे. अमेरिका-इस्राएल आणि इराण यांच्यात युद्ध सुरु झाल्यापासून जेएनपीए बंदरात आलेलं हे पहिलंच एलपीजीवाहू जहाज आहे. बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मुकेश मंगल यांनी काल नवी दिल्लीत आयोजित आंतर मंत्रालयीन पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**पोषण पंधरवडा**

केंद्रीय महिला आणि बालविकासमंत्री अनुपमा देवी यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत 'पोषण पंधरवडा' अभियानाचा आरंभ करण्यात आला. 'बालकांच्या पहिल्या सहा वर्षांत, मेंदूचा जास्तीत जास्त विकास घडवून आणणे' ही या वर्षीच्या पंधरवड्याची संकल्पना आहे. या अभियानाच्या माध्यमातून पोषणाला लोकचळवळ बनवण्याचा प्रयत्न असल्याचं त्या अनुपमा देवी म्हणाल्या.

**मत्स्यव्यवसाय**

मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे. राज्याला मत्स्यव्यवसायात देशात अग्रस्थानी नेण्यासाठी राज्य शासनाने अनेक योजना आणि उपक्रम सुरू केले असून, या उपक्रमांच्या माध्यमातून मत्स्यव्यवसायात राज्य अव्वल ठरेल असा विश्वास राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी केलं. भारतीय कृषी संशोधन परिषदे अंतर्गत, मुंबईतील केंद्रीय मात्स्यिकी शिक्षण संस्थेत आयोजित कार्यशाळेत ते काल बोलत होते.

**पर्यटन**

राज्यातील पर्यटनाला वाव देण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत, धरण परिसरात पर्यटन विकासाला प्राधान्य देण्यात येत असल्याचं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल सांगितलं. विखे पाटील यांनी काल शिर्डी विमानतळावर पत्रकारांशी संवाद साधला. जायकवाडी, माजलगाव, इसापुर या धरणांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील निळवंडे आणि भंडारदरा परिसरातही पर्यटन केंद्र विकसित करुन, रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात येणार असल्याचं ते म्हणाले.

**धाराशिव**

धाराशिवच्या जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या 7 शाळांची 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' म्हणून निवड करण्यात आली आहे. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने राज्यातील 405 शासकीय शाळांना 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' म्हणून विकसित करण्यास मान्यता दिली आहे; यात धाराशिव जिल्ह्यातील 7 शाळांनी स्थान पटकावलं असल्याची माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

**जमीन मोजणी शुल्क**

शेतकऱ्यांना जमीन मोजणीसाठी देण्यात येणाऱ्या शुल्कात कपात करण्यात आली असून, आता एक हजार रुपयांत संपूर्ण मोजणी होणार असल्याची माहिती महसूलमंत्री आणि नागपूर तसंच अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नागपूर विमानतळावर काल प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी आज पावसाचा अंदाज आहे. कोकणात उष्ण, दमट हवामान असेल; तर विदर्भात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**